RNI No. MAHBIL/2012/72704
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–अ–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - २ ] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ३ - ९, २०२२ / माघ १४ - २०, शके १९४३ [ पृष्ठे ०५

## प्राधिकृत प्रकाशन

### विभागीय आयुक्त यांजकडून

### आदेश

क्रमांक कावि/नपप्र/कक्ष-२/१६२१/२०२२.– ज्याअर्थी, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ व महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची अनर्हता नियम, १९८७ मधील तरतुदींनुसार नगरसेवकांनी, महानगरपालिका पक्षाचे / आघाडीचे गटनेत्यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे नोंदणी करणेसाठी माहिती पाठविणे आवश्यक आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका, पोट-निवडणूक-२०२१ मध्ये निवडून आलेल्या सदस्यांनी, पक्ष / आघाडीचे गटनेत्यांनी उक्त नियमाचे नियम ३ *(१) (२)* व नियम ४ *(१) (२)* अन्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कार्यालयास आवश्यक ती माहिती सादर केलेली आहे;

त्याअर्थी, मी, राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून संबंधित नगरसेवकांनी सादर केलेल्या माहितीचा गोषवारा उक्त नियमाचे नियम ५ *(१)* मधील नमुना ४ मध्ये पुढीलप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

सदर माहितीमध्ये काही त्रुटी / दोष असल्याचे निदर्शनास आणून दिल्यास / आल्यास व त्याबाबत विभागीय आयुक्त यांचे समाधान झाल्यास, आवश्यक ती दुरुस्त माहिती महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

## परिशिष्ट

नमुना-४ (नियम ५(१) पहा)

| अ. क्र. | सदस्याचे नाव | वडिलांचे / पतीचे नाव | कायमस्वरूपी पत्ता | निवडून आलेल्या मतदार-संघाचे नाव | निवड झाल्याची / नामनिर्देशित केल्याची तारीख | महानगर-पालिका स्थापन झाल्याची तारीख | पदावधी सुरू झाल्याची तारीख | तो ज्या राजकीय पक्षाशी / आघाडीशी / मोर्चाशी संबंधित आहे त्या पक्षाचे / आघाडीचे / मोर्चाचे नाव | तो ज्या महानगरपालिका पक्षाचा आहे, त्या पक्षाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | परदेशी प्रदिप अमरसिंग. | अमरसिंग गोपालसिंग परदेशी. | ५५५, भराड गल्ली, नेहरु मार्केटमागे, चितळे रोड, अहमदनगर. | प्रभाग क्रमांक ९ (क). | २२-१२-२०२१ | ०१-०९-२०१९ | २२-१२-२०२१ | भारतीय जनता पार्टी. | भारतीय जनता पार्टी. |

**राधाकृष्ण गमे,**
विभागीय आयुक्त, नाशिक.

नाशिकरोड, १ फेब्रुवारी २०२२.

## जिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले :** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* व महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष निवडणूक) नियम, २००५ व सुधारणा २००६.

**आदेश**

क्रमांक पालिका-३/कावि-५००/२०२२.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* व महाराष्ट्र नगरपरिषद (उपाध्यक्ष निवडणूक) नियम, २००५ व सुधारणा, २००६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१-अ, पोट-कलम *(४)* च्या तरतुदींनुसार शेंदुर्णी नगरपंचायतीत निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

यास्तव, मी, अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, जळगाव मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये या प्रकटनाद्वारे खालील नमूद उमेदवार हे शेंदुर्णी नगरपंचायतीच्या उपाध्यक्ष पदासाठी निवडून आल्याचे जाहीर करीत आहे.

**अनुसूची**

| निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव | | नगरपंचायतीचे नाव |
|---|---|---|
| १ | | २ |
| निलेश उत्तम थोरात | .. | शेंदुर्णी |

**अभिजीत राऊत,**

जळगाव, २५ जानेवारी २०२२. जिल्हाधिकारी, जळगाव.

---

## उपआयुक्त (महसूल) यांजकडून

### जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव

### जाहीर नोटिस

क्रमांक मा.व./२११३/२०२१-२२.— (१) अशोककुमार उत्तमचंद शामनाणी, त. म. ९, महात्मा गांधी मार्केट, (२) तन्वीन खान इब्राहिम खान, लो. ले. ६, सेंट्रल फुले मार्केट, (३) मोहनलाल भगवानदास व संजय भगवानदास, त. म. २८, सेंट्रल फुले मार्केट, (४) कुमार भिमसिंग सैंदाणे, त. म. २०६, सेंट्रल फुले मार्केट, (५) अनुराधा ज्ञानेश्वर मोरे, त. म. २, छत्रपती शाहू महाराज व्यापारी संकुल, (६) महात्मा फुले मागासवर्गीय महामंडळ, त.म. ४१, छत्रपती शाहू महाराज व्यापारी संकुल, (७) सविता रवि पाटील, त. म. ४४, छत्रपती शाहू महाराज व्यापारी संकुल, (८) शोभाराज खुशीराम आडवाणी, खुशीराम चेलाराम आडवाणी, त. म. एच-३, एच-४, रेल्वेस्टेशन मार्केट, (९) सुभाषचंद्र शंकरलाल चौरसीया, त.म. एच-५, रेल्वेस्टेशन मार्केट यांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, जळगाव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या उक्त नमूद गाळ्यांबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ८१-ब अन्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सबब या कारणास्तव महानगरपालिकेच्या मालकीचे उक्त गाळे हे दिनांक ९ जानेवारी २०२० व तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ८१-ब मधील तरतुदीनुसार रितसर पंचनामा करून ताब्यात घेण्यात आलेले असून त्या दिवशी त्यातील सामानासह / मालासह / बंद स्थितीत असल्यानुसार गाळा ताब्यात घेतला आहे.

तसेच वर नमूद महानगरपालिका मालकीचा गाळा अनधिकृत वापर केला म्हणून महानगरपालिकेने यापूर्वीच तुम्ही नोटिस घेणार यांना नुकसान भरपाई रक्कम भरणा करणेचे आदेश दिले आहेत. सबब तुम्हास या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदरची नोटिस मिळाल्यापासून १४ दिवसांचे आत महानगरपालिकेने आदेशित केलेली नुकसानभरपाईची संपूर्ण रक्कम जमा करून वर नमूद महानगरपालिकेच्या मालकीच्या गाळ्यात असलेला माल / सामान घेऊन जावा, येणेप्रमाणे करण्यास चुकलात तर मात्र, महानगरपालिका उक्त नमूद गाळ्यातील संपूर्ण माल तसेच सामानाचा लिलाव करील व महानगरपालिकेची थकबाकी त्या लिलावातून वसूल करून उर्वरित थकबाकीच्या वसुलीसाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**प्रशांत पाटील,**
उपआयुक्त (महसूल),
जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव.

जळगाव, ३१ जानेवारी २०२२.

---

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून खालील दर्शविलेल्या दिनांकास प्रसिद्ध झालेली आहे.**

**शुक्रवार, जानेवारी २८, २०२२ / माघ ८, शके १९४३**

## जिल्हाधिकारी यांजकडून

### आदेश

क्रमांक नपाप्र-१/सा.नि./साक्री न.पं.-८७/२०२२.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १९ *(१)* अन्वये राज्य निवडणूक आयोगाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, जलज शर्मा, जिल्हाधिकारी, धुळे या प्रगटनाद्वारे असे जाहीर करतो की, **साक्री** नगरपंचायतीच्या १३ प्रभागांसाठी दिनांक २१ डिसेंबर २०२१ व ४ प्रभागांसाठी दिनांक १८ जानेवारी २०२२ रोजी घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये खालील उमेदवार हे त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रभागामधून नगरपंचायत सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत.

### अनुसूची

**साक्री नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक, २०२१-२०२२**

| अ. क्र. | निवडून आलेल्या सदस्यांचे नाव | | प्रभाग क्रमांक | शेरा (जर जागा राखीव असेल तर कोणासाठी ) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ |
| १ | खैरनार कल्पना राजेंद्र | .. | १ | सर्वसाधारण |
| २ | भावसार संगिता बाबूलाल | .. | २ | सर्वसाधारण स्त्री |
| ३ | पवार उषाबाई अनिल | .. | ३ | अनुसूचित जमाती स्त्री |
| ४ | निकुंभे प्रवीण राजेंद्र | .. | ४ | अनुसूचित जमाती |
| ५ | देसले मनीषा महेंद्र | .. | ५ | सर्वसाधारण स्त्री |
| ६ | सोनवणे रेखा आबा | .. | ६ | सर्वसाधारण स्त्री |
| ७ | नागरे सोनल सुमित | .. | ७ | सर्वसाधारण स्त्री |
| ८ | पवार जयश्री हेमंत | .. | ८ | अनुसूचित जमाती स्त्री |
| ९ | नागरे सुमित ज्ञानेश्वर | .. | ९ | सर्वसाधारण |
| १० | अहिरराव पंकज पंढरीनाथ | .. | १० | सर्वसाधारण |
| ११ | भोसले उज्वला विजय | .. | ११ | सर्वसाधारण स्त्री |
| १२ | पगारिया जयश्री विनोद | .. | १२ | सर्वसाधारण स्त्री |
| १३ | भोसले राहुल अरविंद | .. | १३ | सर्वसाधारण |
| १४ | भोसले गजेंद्र रामराव | .. | १४ | सर्वसाधारण |
| १५ | वाघ दिपक दिलीप | .. | १५ | अनुसूचित जाती |
| १६ | पठाण नरगीसबी याकुबखा | .. | १६ | सर्वसाधारण स्त्री |
| १७ | गिते बापु पुंडलिक | .. | १७ | सर्वसाधारण |

**जलज शर्मा,**
जिल्हाधिकारी, धुळे.

धुळे, २७ जानेवारी २०२२.

## ORDER

No. MUN-1/Gen. Election/Sakri N.P.-87/2022.– In exercise of the powers vested in sub-section *(1)* of Section 19 of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 and the said powers delegated to the Collector by the State Election Commission, I, Jalaj Sharma, Collector, Dhule hereby publish the names of the candidates who have been declared elected as Councillors of the Nagarpanchayat **Sakri** from the wards shown against their names, in the General Election held on 21st December 2021 for 13 wards and on 18th January 2022 for 4 wards.

### Schedule

### Sakri Nagarpanchayat General Election, 2021-2022

| Sr. No. | Name of th elected Councillor | | Ward No. | Remarks (Whether the seat is Reserved and if so, for whom) |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 3 | 4 |
| 1 | Khairnar Kalpana Rajendra | .. | 1 | General |
| 2 | Bhavsar Sangita Babulal | .. | 2 | General (Women) |
| 3 | Pawar Ushabai Anil | .. | 3 | Scheduled Tribes (Women) |
| 4 | Nikumbhe Praveen Rajendra | .. | 4 | Scheduled Tribes |
| 5 | Desale Manisha Mahendra | .. | 5 | General (Women) |
| 6 | Sonawane Rekha Aaba | .. | 6 | General (Women) |
| 7 | Nagare Sonal Sumit | .. | 7 | General (Women) |
| 8 | Pawar Jayashree Hemant | .. | 8 | Scheduled Tribes (Women) |
| 9 | Nagare Sumit Dnyaneshwar | .. | 9 | General |
| 10 | Ahirrao Pankaj Pandharinath | .. | 10 | General |
| 11 | Bhosale Ujwala Vijay | .. | 11 | General (Women) |
| 12 | Pagaria Jayashree Vinod | .. | 12 | General (Women) |
| 13 | Bhosale Rahul Arvind | .. | 13 | General |
| 14 | Bhosale Gajendra Ramrao | .. | 14 | General |
| 15 | Wagh Deepak Dilip | .. | 15 | Scheduled Caste |
| 16 | Pathan Nargisbi Yakubkha | .. | 16 | General (Women) |
| 17 | Gite Bapu Pundalik | .. | 17 | General |

**JALAJ SHARMA,**
Collector, Dhule.

Dhule, 27th January 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.